मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२






KUMAR LIFESPACES
PRESENT FOR YOUR FUTURE

प्रायोजक

## एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईझेस, पुणे

प्रस्तुत

# फेस ऑफ इन्स्पिरेशन

## पुरस्कार वितरण सोहळा २०२४

Express | न्यूज एक्सप्रेस | महाईन्यूज

# स्नेह निमंत्रण...

**गुरुवार** दि. २८ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ३ वा.

**ठिकाण-** प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड.

**प्रमुख मार्गदर्शक**

**श्री. अविनाश धर्माधिकारी**
(माजी सनदी अधिकारी,
संस्थापक,अध्यक्ष - चाणक्य मंडल परिवार )

**प्रमुख आकर्षण**

**श्री. अंकुश चौधरी**
(प्रसिद्ध मराठी अभिनेते)

**प्रमुख पाहुणे**

**मा. श्री. महेशदादा लांडगे**
(आमदार, भोसरी विधानसभा)

**मा. श्री. शंकर जगताप**
(आमदार, चिंचवड विधानसभा)

**मा. श्री. आण्णा बनसोडे**
(आमदार, पिंपरी विधानसभा)

**मा. श्री. अमेय इंद्रकुमार जैन**
(कुमार प्रॉपर्टीज लाईफस्पेस)

**मा. श्री. सुनील शेळके**
(आमदार, मावळ विधानसभा)

**मा. श्री. शेखर सिंह**
(आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका)

**मा. श्री. विनयकुमार चौबे**
(आयुक्त, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय)

**मा. प्रा. कविता आल्हाट**
(शहराध्यक्ष, राष्ट्रवादी महिला काँग्रेस)

- निमंत्रक -

**श्री. अधिकराव दिवे पाटील**
संस्थापक, एक्सप्रेस मिडिया एंटरप्राइजेस

**सौ.मनिषा थोरात-पिसाळ**
न्यूज एक्सप्रेस मराठी संचालिका

# आता महापालिका निवडणुकीकडे लक्ष

## पुणे महापालिकेसह स्थानिक स्वस्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा आणि आता विधानसभेची निवडणुकीची रणधुमाळी पार पडल्यानंतर पुणे महापालिकेसह स्थानिक स्वस्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष लागले आहे.

आजघडीला राज्यातील सर्वच महापालिकांवर प्रशासकराज सकून यात पुणे महापालिकेचाही समावेश आहे. पुणे महापालिकेची मुदत मार्च २०२२ मध्ये संपल्यापासून येथील कारभार राज्य सरकारनियुक्त प्रशासक या नात्याने महापालिका आयुक्त बघत आहेत.




येत्या तीन महिन्यात महापालिका निवडणुका पार पडतील, अशी चर्चा आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयातील ३० याचिकांवर एकत्रित निर्णय झाल्यास महापालिकांसह राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा होईल. तसेच या निवडणुका पावसाळ्यापूर्वी घेतला जात्यातील असा दावा आता राजकारणातील तज्ज्ञांसह पदाधिकारी बोलू लागले आहेत.

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला २८८ मतदारसंघापैकी २३५ जांगावर दणदणीत विजय मिळाला आहे. त्यामुळे महायुतीला आता पोषक वातावरण आहे. विधानसभेचा निकाल हाती आल्यानंतर येत्या दोन दिवसात राज्यात सरकार स्थापन होईल. त्यानंतर पुणे महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा विषय हाती घेतला जाईल, अशी चर्चा रंगली आहे. महाविकास आघाडी आणि त्यानंतर महायुती सरकारने आपल्या कार्यकाळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या होत्या.

राज्यात सध्याच्या परिस्थितीत ९५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहे. नगरसेवक नसल्याने अनेक कामे रखडल्या आहेत. पायाभुत सुविधांपासून नागरिकांना वंचित राहवे लागत आहे. कामे होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. याचाच फटका अनेक उमेदवारांना बसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या रखडलेल्या निवडणुका तात्काळ घ्याव्या, अशी मागणी नागरिकांसह इच्छुक उमेदवारांकडून होऊ लागली आहे.

दरम्यान, तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकारने २०१७मध्ये महापालिकांच्या निवडणुका या चार सदस्यीय प्रभागरचनेनुसार लढविल्या होत्या. भाजपला त्याचा राज्यभर फायदा झाला होता. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारने तीन सदस्यीय प्रभाग रचना करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महापालिका निवडणुकांची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. आता राज्यात पुन्हा सत्तांतर झाल्यानंतर शिंदे सरकारने आगामी महापालिका निवडणुका तीन सदस्यीय प्रभाग रचनेनुसार होतील, हा निर्णय कायम ठेवला होता. मात्र, त्याच वेळी महाविकास आघाडीने वाढविलेली सदस्य संख्या कमी केली होती. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असून, त्यावर अद्याप निर्णय आलेला नाही. ही याचिका प्रलंबित असतानाच शिंदे सरकारने तीन सदस्यीय प्रभाग रचनेच्या निर्णयात बदल करून, ही रचना चार सदस्यांची केली आहे.

---

# पुणे जिल्ह्यात 47 हजार मतदारांची 'नोटा'ला पसंती

## राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या पराभवाचा फरक 'नोटा'च्या जवळ

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरासह जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांमधून ३०३ उमेदवारांनी निवडणुकीच्या माध्यमातून जनमताचा कौल आजमावला. मात्र, ४७ हजार ६८५ मतदारांनी सर्वच उमेदवारांना नाकारत 'नोटा'ला पसंती दिल्याचे मतमोजणीमध्ये स्पष्ट झाले आहे.




विशेष म्हणजे, वडगाव शेरी मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या पराभवाची मते 'नोटा'च्या जवळपास जाणारी असल्याचे समोर आले आहे. टिंगरे हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार बापूसाहेब पठारे यांच्याकडून ४,७१० मतांनी पराभूत झाले. या मतदारसंघात तब्बल ४,२३७ मतदारांनी निवडणूक लढवत असलेला कोणताही उमेदवार न आवडल्यामुळे 'नोटा'चे बटन दाबणे पसंत केले.

पुणे शहरात आठ, पिंपरी चिंचवडमध्ये तीन आणि उर्वरीत ग्रामीण भागात दहा असे एकूण २१ विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघातून महायुती, महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांसोबत वंचित बहुजन आघाडी, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, बहूजन समाज पक्ष आणि इतर प्रादेशिक, स्थानिक पक्ष आणि अपक्ष असे ३०३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

चिंचवड मतदारसंघातून सर्वाधिक २१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते, त्याच मतदारसंघात सर्वाधिक ४,३१६ मतदारांनी 'वरीलपैकी कोणीही नाही' (नोटा) हा पर्याय निवडला आहे. त्यापाठोपाठ शहरातील वडगाव शेरी मतदारसंघात सर्वाधिक ४,२३७ मतदारांनी नोटा पर्याय निवडला आहे. या मतदारसंघातील राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे टिंगरे अवघ्या ४,७१० मतांनी पराभूत झाले. तिसऱ्या क्रमांकावर कोथरूड मतदारसंघातून तीन हजार मतदारांनी 'नोटा'ला मतदान केल्याचे मतमोजणीनंतर समोर आले आहे. कोथरूडमधून राज्याचे उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील निवडणुकीच्या रिंगणात होते. शिवाजीनगरमधून भाजपचे विद्यमान आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्यासह १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. शिवाजीनगर मतदारसंघातून सुमारे दोन हजार मतदारांनी एकही उमेदवार पसंत नसल्याने 'नोटा'ला मतदान केले आहे.

ग्रामीण भागातील जुन्नर विधानसभा मतदारसंघात १,३७६ मतदारांनी 'नोटा' पर्यायावर विश्वास दाखविला. आंबेगाव १,१५७, खेड-आळंदी १,६९२, शिरूर २,१५७, दौंड १,२११, इंदापूर ६३४, बारामती ७७९, पुरंदर १,४८४, भोर २,७२० आणि मावळ विधानसभा मतदारसंघात २,७१५ मतदारांनी 'नोटा'ला मतदान केल्याचे जिल्हा निवडणूक प्रशासनाकडून सांगण्यात आले.

### जिल्ह्यात 'नोटा'ला झालेले मतदारसंघनिहाय मतदान

» **जुन्नर : १३७६, आंबेगाव : ११५७, खेड आळंदी : १६९२, शिरूर : २१५७, दौंड : १२११, इंदापूर : ६३४, बारामती : ७७९, पुरंदर : १४८४, भोर : २७२०, मावळ : २७१५, चिंचवड : ४३१६, पिंपरी : ४०१३, भोसरी : २६८५, वडगाव शेरी : ४२३७, शिवाजीनगर : २०४४, कोथरूड : ३१५२, खडकवासला : २९००, पर्वती : २४६१, हडपसर : २९४६, पुणे कॅन्टोन्मेंट : १७९३, कसबा : १२१३**

# आळंदी यात्रेनिमित्त पीएमपीच्या 229 बस रवाना

## यात्राकाळात भाविकांसाठी रात्रीही बससेवा सुरु राहणार : वाहतूक व्यवस्थेत केला बदल



**पिंपरी | प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशी व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त पीएमपीएमएलच्या सेवा मार्गस्थ झालेल्या आहेत. २९ नोव्हेंबरपर्यंत या साठी महामंडळाच्या ३४३ बस सोडण्यात येणार आहेत. त्यापैकी २२९ ज्यादा बसेस या मार्गावर असणार आहेत. गर्दी लक्षात घेता पीएमपीएमएलकडून २६ ते २८ या काळात रात्री ११ ते सकाळी ५ वाजेपर्यंत रातराणी बस सेवा देण्यात येणार आहे. रात्री पीएमपीएमएलचे एकदिवसीय, साप्ताहिक, मासिक, ज्येष्ठ नागरिक व इतर पास चालणार नसल्याचे पीएमपीएमएलने स्पष्ट केले आहे. दरम्यान, वाहतूक पोलिसांनी वाहतूक व्यवस्थेमध्ये देखील बदल केले असल्याने त्याचे पालन करावे लागणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी, पिंपरी, चिंचवड, देहूगाव, भोसरी, रहाटणी आणि पुणे शहरातील स्वारगेट, हडपसर, पुणे स्टेशन, मनपा भवन या स्थानकांवरून जादा २२९ आणि नियमित मार्गावर सुरू असलेल्या ११४ अशा एकूण ३४३ बस सोडण्यात येणार आहेत. आळंदी यात्रेनिमित्ताने आळंदी गावातील सध्याचे बसस्थानक स्थलांतरित करून काटेवस्ती येथून बसेसचे संचलन करण्यात येणार आहे.

आळंदी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहतुकीच्या सोयीसाठी जादा बस सोडण्यात येणार आहेत. पीएमपीएमएलकडून दररोज १६०० ते १६५० बसमार्फत सेवा दिली जाते. ताफ्यात अगोदरच बस संख्या कमी आहे, यात्रेसाठी २२९ जादा बस सोडण्यात येणार असल्यामुळे बसमार्ग क्र. २५७ आळंदी ते मरकळ, बस मार्ग क्र. ३६४ आळंदी ते चाकण आंबेठाण चौक व बस मार्क क्र. २६४ भोसरी ते पाबळ हे तीन बसमार्ग २९ नोव्हेंबरपर्यंत बंद राहतील.

आळंदी यात्रेसाठी स्वारगेट, हडपसर, पुणे स्टेशन, महापालिका भवन, निगडी, पिंपरी, चिंचवड, देहूगाव, भोसरी, रहाटणी या स्थानकांवरून जादा बस सुटणार आहेत. याच स्थानकांवरून भाविकांच्या गर्दीनुसार रात्र बससेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही विशेष बससेवा रात्री १० नंतर सुरू होईल. त्यासाठी नियमित तिकीट दरापेक्षा ५ रुपये अधिक तिकीट दर आकारणी होईल. तसेच एकदिवसीय, साप्ताहिक, मासिक, ज्येष्ठ नागरिक व इतर पासधारकांस यात्रा कालावधीत रात्री १० नंतरच्या जादा बससेवेसाठी पासचा वापर करून प्रवास करता येणार नाही.

### सोहळ्याच्या निमित्ताने आयुक्तांकडून आढावा

» आळंदी यात्रेच्या सोहळ्याच्या निमित्ताने पोलीस आयुक्तांनी आढावा घेतला. वाहतूक व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था आणि भाविकांची गर्दी लक्षात घेता पार्किंग व्यवस्थेबाबत सूचना केल्या. यावेळी स्थानिक अधिकारी, आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी त्याचप्रमाणे देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त आणि व्यवस्थापक उपस्थित होते. त्याचप्रमाणे पिण्याचे पाणी साठी १५ टँकर, स्वच्छतासाठी ८०० फिरते शौचालय. उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वारीमध्ये स्वच्छता वॉरियर्स म्हणून कार्यकर्त्यांची नेमणूक केली जाणार आहे.

# रावेत गृहप्रकल्पासाठी पुन्हा निविदा काढणार

## लाभार्थ्यांना घरासाठी आणखी दोन ते तीन वर्षे करावी लागणार प्रतीक्षा



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रावेत येथील पंतप्रधान आवास योजनेतील गृहप्रकल्पांची निविदा रद्द करण्यात आली आहे. आता नव्याने निविदाप्रक्रिया राबविली जाणार आहे. ऑक्टोबर २०२० पासून बंद असलेले हे काम, त्यात निविदाप्रक्रिया राबविण्यात लागणारा कालावधी यामुळे लाभार्थ्यांना घरासाठी आणखी किमान २ ते ३ वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

रावेत येथील २ हेक्टर जागेत हा प्रकल्प राबवला जात आहे. त्यासाठी २०१९ ला निविदाप्रक्रिया राबवण्यात आली होती. त्या गृहप्रकल्प बांधकामाची वर्कऑर्डर ३० मे २०१९ ला देण्यात आली. एकूण ७९ कोटी ४५ लाख ९२ हजार ७९० रुपये खर्चाचे काम मन इन्फ्रा. कन्स्ट्रक्शन देण्यात आले आहे. इमारतीचे काम सुरू करण्यात आले. फाउंडेशनचे काम झाले होते. प्रकल्पाविरोधात रावेत येथील मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने कामास स्थगिती दिल्याने तेथील काम ऑक्टोबर २०२० पासून ठप्प आहे.

उच्च न्यायालयाने याचिका फेटाळत महापालिकेस काम करण्याचे आदेश दिले आहेत. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निकाल देत काम सुरू करण्यास परवानगी दिली आहे. न्यायालयीन अडचण दूर झाल्याने काम लवकरच सुरू होईल, अशी लाभार्थ्यांना आस होती. दरम्यान, मागील चार वर्षांपासून हे काम बंद आहे. तसेच, बांधकाम साहित्यांचे दर महाग झाल्याने खर्च वाढला आहे. त्यामुळे या प्रकल्पाची नव्याने निविदा काढण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

### लाभार्थ्यांना घराची आस

» रावेत गृहप्रकल्पात ३२३ चौरस फूट चटई क्षेत्र आकाराच्या एकूण ९३४ सदनिका आहेत. सदनिकांची सोडत २७ फेब्रुवारी २०२१ ला काढण्यात आली. त्यासाठी लाभार्थ्यांकडून ५ हजार रुपये महापालिकेने जमा करून घेतले. पावणेचार वर्षे झाले तरी, सदनिका न मिळाल्याने लाभार्थी नाराजी व्यक्त करीत आहेत. नव्याने निविदाप्रक्रिया राबवण्यास किमान ३ ते ४ महिन्यांचा कालावधी जाणार आहे. विधानसभा आचारसंहितेनंतर निविदा प्रकिया सुरू होईल. त्यानंतर प्रत्यक्ष काम पूर्ण होण्यास अडीच ते तीन वर्षांचा कालावधी लागू शकतो. म्हणजे आणखी किमान तीन वर्षे घरासाठी सर्वसामान्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# शहरी मतदार संघांमध्ये बनावट मतदान वाढले

## नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीपासून बनावट मतदानाचे प्रकार वाढले : प्रशासनाची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत आठ शहरी मतदारसंघात ६०० हून अधिक बनावट (टेंडर) मतदान झाले आहे, तर ३०० मतपत्रिकां बाद करण्यात आल्या आहेत. सर्वाधिक १६२ बनावट आणि ६५ मतपत्रिका वडगाव शेरी मतदारसंघातून मतदान बाद केले आहे., त्या खालोखाल कोथरूड मतदारसंघातील ९३ बनावट, तर १८ मतपत्रिका मतमोजणीवेळी बाद केल्या आहेत. विशेषतः लोकसभा निवडणुकीपासून बनावट मतदानाचे प्रकार वाढले असून, विधानसभा निवडणुकीत या मतदारांची संख्या वाढल्याचे निरीक्षण जिल्हा निवडणूक प्रशासनाने नोंदवले.



पुणे शहरात वडगावशेरी, शिवाजीनगर, कोथरूड, खडकवासला, पर्वती, हडपसर, पुणे कँटोन्मेंट आणि कसबा पेठ असे आठ विधानसभा मतदारसंघ आहेत. या मतदारसंघांसाठी शनिवारी मतमोजणी प्रक्रिया झाली. विजयी उमेदवार आणि पराभूत उमेदवार यांच्यात मोठ्या मताधिक्याचा फरक असल्याने कोणालाही बनावट मतदानाची आवश्यकता भासली नाही. मात्र, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीपासून बनावट मतदानाचे प्रकार वाढले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

वडगाव शेरी मतदारसंघात सर्वाधिक १६२ मते बनावट आहेत. त्यापाठोपाठ कोथरूड मतदारसंघात ९३, हडपसर मतदारसंघात ७८, खडकवासला ७५, पर्वती ६१, शिवाजीनगर आणि पुणे कँटोन्मेंट मतदारसंघात प्रत्येकी ४९ आणि कसबा मतदारसंघात ५२ असे एकूण ६१९ मतदान बनावट झाले आहे. हे मतदार मतदान केंद्रात येण्यापूर्वीच त्यांच्या नावाने मतदान करून गेले असल्याचे आढळून आले. संबंधित मतदारांनी दाखविलेल्या कागदपत्रांनुसार मतदानाचा हक्क बजावता आला असला, तरी निवडणुकीच्या रिंगणातील उमेदवाराला या मतदानाचा फायदा झालेला नाही. परिणामी या मतदारांचा मतदानाचा हक्क बजावूनही हे मतदान निरूपयोगी ठरले आहे.

**काय आहे बनावट (टेंडर व्होट) मतदान?**

एखादा मतदार मतदान केंद्रावर जाण्यापूर्वीच त्याच्या नावाने दुसऱ्या कोणीतरी मतदान करून गेल्याचे आढळून येते. अशा वेळी संबंधित मतदारांना मतदानाचा अधिकार बजावता येतो. निवडणूक अधिकाऱ्याकडे १७ ब क्रमांकाचा तक्रार अर्ज करून मतपत्रिकेवर शिक्का मारून मतदानाचा हक्क बजावता येतो. मात्र, निकालावर परिणाम करण्याएवढी अल्प तफावत असल्यास हे मतदान विचारात घेऊन मतांची मोजणी करण्यात येते.

### 300 मतपत्रिका बाद

» निवडणूक काळात कर्तव्यावर असलेल्या मतदारांना, तसेच ८५ वर्षांपुढील ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदार, लष्करी सेवेत कर्तव्यावर असलेल्या जवानांना टपाली मतदानाचा अधिकार आहे. शहरासह जिल्ह्यातून ३४ हजार टपाली मतदान झाले होते. लष्करी सेवेतील एक हजारांहून अधिक मतदारांनी इलेक्ट्रॉनिक ट्रान्समिटेड पोस्टल बॅलेट (ईटीपीबीएस) प्रणालीद्वारे टपाली मतदानाचा हक्क बजावला होता. त्यापैकी ३०० मतपत्रिका बाद करण्यात आल्या आहेत. यामध्ये वडगावशेरी मतदारसंघातील सर्वाधिक ६५ टपाली मतपत्रिका बाद करण्यात आल्या आहेत. त्यापाठोपाठ हडपसर ५६, खडकवासला ५३, शिवाजीनगर ४१, पर्वती आणि पुणे कँटोन्मेंट प्रत्येकी ३४, कोथरूड १८ आणि कसबा २० असे एकूण ३२१ मतपत्रिका बाद करण्यात आल्या आहेत.

# परराज्यातून आवक घटल्याने फळभाज्या महागल्या

## कांदा, बटाटा, लसूण, भेंडी, गवार, कोबी, शेवगा महागला : घेवडा, मिरची उतरली

**पुणे | प्रतिनिधी**

लहरी हवामानामुळे परराज्यात फळभाज्यांच्या उत्पादन घट झाली आहे. त्यामुळे, तेथील स्थानिक बाजारपेठांसह शहरातील बाजारपेठेतही कांदा, बटाटा, लसूण, भेंडी, गवार, कोबी अन् शेवग्याची आवक कमी प्रमाणात होत आहे. त्यातुलनेत मागणी जास्त असल्याने या फळभाज्यांच्या भावात गत आठवड्याच्या तुलनेत दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. याउलट आवक वाढल्याने घेवडा व मिरचीच्या भावात दहा टक्क्यांनी घसरण झाली. मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे उर्वरित फळभाज्यांचे भाव स्थिर असल्याची माहिती ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.



पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तरकारी विभागात रविवारी (दि. 24) राज्यासह परराज्यातून 90 ते 100 ट्रक शेतमाल विक्रीसाठी दाखल झाला. परराज्यातून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक आणि गुजरात येथून हिरवी मिरची 10 ते 12 टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी 3 ते 4 टेम्पो, कर्नाटक येथून घेवडा 3 ते 4 टेम्पो, आंध्र प्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा 2 ते 3 टेम्पो, इंदौर येथून 4 ते 5 टेम्पो गाजर, कर्नाटक येथून 50 गोणी भुईमूग शेंग, मध्यप्रदेश येथून मटार 10 ते 12 ट्रक व मध्य प्रदेश येथून लसणाची सुमारे 7 ते 8 टेम्पो इतकी आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकमध्ये सातारी आले सुमारे 500 ते 600 गोणी, भेंडी 5 ते 6 टेम्पो, गवार 5 ते 6 टेम्पो, टोमॅटो सात ते आठ हजार पेटी, हिरवी मिरची 4 ते 5 टेम्पो, काकडी 7 ते 8 टेम्पो, फ्लॉवर 10 ते 12 टेम्पो, कोबी 4 ते 5 टेम्पो, ढोबळी मिरची 10 ते 12 टेम्पो, तांबडा भोपळा 10 ते 12 टेम्पो, कांदा सुमारे 70 ते 80 ट्रक तर इंदौर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा 40 ते 45 ट्रक आवक झाली.

### कोथिंबीर, मेथी, शेपू, कांदापात, करडईचे भाव वधारले

» मार्केट यार्डातील तरकारी विभागात पालेभाज्यांची आवक घटली आहे. त्या तुलनेत मागणी जास्त असल्यामुळे पालेभाज्या महागल्या आहेत. घाऊक बाजारात सर्वाधिक कोथिंबिरीच्या भावात जुडीमागे 7 रुपयांनी वाढ झाली आहे. तर मेथी, शेपू, कांदापात, मुळे आणि पालक पाच रुपये, चुका दोन रुपये, तर करडई, चवळई आणि अंबाडीच्या भावातही जुडीमागे प्रत्येकी एक रुपयांनी वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात मेथीच्या जुडीची 40 रुपयांनी, तर कोथिंबिरीची 30 रुपयांनी विक्री होत आहे. घाऊक बाजारात रविवारी (दि. 24) कोथिंबिरीची सुमारे एक लाख जुडी तर मेथीची 40 हजार जुडींची आवक झाली होती. ही आवक मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहे.